शपथेवर उलट तपास श्री. यु. व्ही. देशपांडे अधिवक्ता गैरअर्जदारा तर्फे —

१२. चोरगांव ते चंदपूर बसमध्ये मी वाहक म्हणून कामगीरी करीत असताना सदर बसमध्ये ४० प्रवासी व ५ ते ६ पासधारक *प्रवासी प्रवास करीत होते. माझी बस सकाळी ९.३० वे दरम्यान डल्ब्यूसीएल शक्तीनगर चे गेटचे समारे तपासण्यात आली होती. विना तिकीट प्रवास करणारा प्रवासी हा सीनाळा ता. जि. चंद्रपूर येथून बसला होता. सिनााळया वरुन माझे बसमध्ये* १०—१२ प्रवासी व ५—६ पास धारक विधार्थी बसले होते. मी सन २०११ पासून वाहक म्हणून रुजू झालेलो आहे.

१३. हे म्हणने खरे आहे की २ ते ३ वेळा विना तिकीट प्रवासी आढळल्यामुळे मला महामंडळाने दंड आकारला आहे. हे म्हणने खरे आहे की त्यावेळेस मी दंड भरलेला आहे. आता मला माझी सेवा पुस्तीका दाखवीली, त्यास नि. **सी—०९** देण्यात आले. सेवा पुस्तीके मधील असलेल्या नोंदी विषयी माझी कोणतीही तक्रार नाही. सेवा पुस्तीकेमध्ये दैनंदीन प्रक्रीयेमधील नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

१४. हे म्हणने खरे आहे की सदर बस ही साधारण बस होती व त्या बसमध्ये एकावेळी ४३ ते ४४ प्रवासी प्रवास करु शकत होते. सिनाळया पासून ज्या ठीकाणी बसची तपासणी झाली ते ठीकाण ४ ते ५ की. मी अंतरावर आहे. ज्यावेळी बस तपासण्यात आली त्यावेळी मी माझे सीटवर बसलेले होतो. हे म्हणने खरे आहे की ज्यावेळी बस

तपासली त्यावेळी मला समजले की १ प्रवासी विना तिकीट प्रवास करीत आहे. हे म्हणने खरे आहे की जो कोणी प्रवासी बसमध्ये बसतो त्याला तिकीट देणे हे माझे कर्तव्य आहे. हे म्हणने खरे नाही की विना तिकीट प्रवासी बसमध्ये झोपून होता हे मी खोटे सांगत आहे. विना तिकीट प्रवासी हा कशा मुळे झोपून होता याबाबत मी त्याच्याकडे जावून चौकशी केली नाही.

१५. विना तिकीट प्रवासी हा बसमध्ये प्रवास करीत होता हे मला माहीत नव्हते. हे म्हणने खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पूर्ण झाला.

फेर तपास — काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

स्वा/—

(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. २५.०७.२०२५.